# शिवराज्याभिषेक गीत -
# छत्रपती शिवराय जाहले छत्रपती सरकार

**सह्याद्रीच्या कड्याकड्यातून घुमला जयजयकार ।**
**छत्रपती शिवराय जाहले छत्रपती सरकार ||धृ ||**

**रायगडावर अवतरला हा इंद्राचा दरबार ।**
**शिवराय बैसले सह्य आसनी शोभे विश्वसाकार ।**
**राज्याभिषेकी फडके भगवा सूर्याचा अवतार ।**
**छत्रपती शिवराय जाहले छत्रपती सरकार ||१||**

**शिवसदरेवर घुमती आजही शाहीरांची ललकार ।**
**शिवरायांच्या पराक्रमाचे गीत गाती झुंजार ।**
**इतिहासाच्या पानावरचा सुवर्ण साक्षात्कार ।**
**छत्रपती शिवराय जाहले छत्रपती सरकार ||२||**

**स्वराज्यास्तव प्राण अर्पिती राजांचे सरदार ।**
**कुठेच नव्हते दिसत शिवबाला राज्याचे शिलेदार ।**
**झुकवूनी माथा करू तयांना प्रणाम वारंवार ।**
**छत्रपती शिवराय जाहले छत्रपती सरकार ||३||**

छत्रपतींचे वंशज असे युवराज संभाजी राजे ।
जिजाई परि माता ही दिसे युवराज्ञी संयोगिता राजे ।
जगदंबेचा दास आळवितो,
छत्रपतींचा शाहीर गातो गर्जे राजदरबार ।
छत्रपती शिवराय जाहले छत्रपती सरकार ||४||

शिवरायांचे गुण गावया मिळते स्फूर्ती अपार ।
माता पित्यांचा हात शिरावर होई स्वप्न साकार ।
अंबादासाचा दास अजिंक्य करीतो मुजरा त्रिवार ।
छत्रपती शिवराय जाहले छत्रपती सरकार ||५||

रचनाकार
प्रा. शाहीर अजिंक्य लिंगायत